## २) जागतीक बँक सहाय्यीत - महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP)

१. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाचा प्रमुख उद्देश राज्यातील शेतीची उत्पादकता वाढविणे, शेतकऱ्याच्या शेतमालास किफायतशिर भाव मिळवून देणे व त्यांाचा बाजार पेठामधील सहभाग वाढविणे हा आहे.

२. हा प्रकल्प एकुण ७०३.९५ कोटीचा असुन त्यामध्ये जागतिक बँकेचा हिस्सा ४६१.२१ कोटी, महाराष्ट्र शासनाचा हिस्सा ५१.७२ कोटी व प्रकल्पाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी संस्थाचा हिस्सा १९१.०२ कोटी आहे. घटक निहाय जागतिक बँकेच्या आर्थिक सहभागाचा तपशील खालील प्रमाणे:

(रक्कम कोटीत)

| घटक | जागतिक बँक हिस्सा | महाराष्ट्र शासन हिस्सा | लाभार्थी संस्था हिस्सा | एकूण किंमत | मार्च २०१४ पर्यंत झालेला खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| अ) बाजारपेठ मागणीधारित शेतमाल उत्पादनास चालना देणे | १३४.१९ | १४.९१ | - | १४९.१० | ५०.९६ | ३०.३४ |
| ब) शेतकऱ्याचा बाजार पेठेतील सहभाग वाढविणे | | | | | | |
| ब.१) पर्यायी बाजार साखळी निर्माण करणे | १४२.२९ | १५.८१ | १८.१५ | १७६.२५ | ४४.१४ | २०.५५ |
| ब.२) कृषि उत्पन्न बाजार समित्या व आठवडी बाजाराचे आधुनिकीकरण | १२९.०० | १४.३३ | १७२.८७ | ३१६.२० | २५.८६ | १०.६४ |
| क) प्रकल्प व्यवस्थापन | ५५.७३ | ६.६७ | - | ६२.४० | २६.४९ | ३३.८९ |
| **एकूण** | **४६१.२१** | **५१.७२** | **१९१.०२** | **७०३.९५** | **१४७.४४** | **२०.९४** |

३. बाजाराभिमूख शेतमाल विक्रीची व्यवस्था अधिक बळकट व्हावी यासाठी जिल्हास्तरीय आत्मा, शेतकरी सहाय्य व सल्ला केंद्र, फळप्रक्रिया प्रशिक्षण संस्था व वसंतराव नाईक कृषि व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था (वानामती) नागपूर यांच्या माध्यमातून कृषी विस्तार संवा प्रभावीरित्या उपलब्ध करणे व संबंधीत अधिका-यांची क्षमता बांधणी, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्यातील आत्माकडे पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात; यासाठी आवश्यक माहिती तंत्रज्ञान विषयक साधने त्यामध्ये संगणक, लॅपटॉप इ. प्रकल्प सहाय्यातून उपलब्ध केले आहेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यतूल दोन याप्रमाणे ६६ शेतकरी सहाय्य व सल्ला केंद्रासाठी देखील एल.सी.डी. प्रोजेक्टर, पोस्टर्स इ. साधने उपलबध केली आहेत. या साधनांचा वापर गावागावांतून कृषीविषयक जनजागृती करण्यासाठी केला जात आहे. जिल्ह्यातील संलग्न शासन विभागाच्या अधिका-यांसाठी कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्थामध्ये केले जाते. यामुळे प्रकल्प उपघटकांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत आहे. प्रकल्प कार्यक्षेत्रातील गावातून शेतक-यांचे संघटन होवून लोकसंचलीत उत्पादक संस्था तयार

व्हाव्यात यादृष्टीने दुस-या व तिस-या टप्प्यातील एकंदर २३ जिल्ह्यांमध्ये सेवा पुरवठादार संस्थांची नेमणूक केली आहे. राज्यामध्ये सुमारे १३००० शेतकरी गटांची स्थापना करणे व या गटांच्या एकत्रीकरणातून ४०० शेतकरी उत्पादक संस्थांची स्थापना करुन त्यांना सक्षम करणे, या कामासाठी सेवा पुरवठादार संस्थांची नेमणूक केली असून पहिल्या टप्प्यातील १० जिल्ह्यात ३९०० शेतकरी गट निर्मिती झाली आहे. तसेच सर्व जिल्ह्यातून गट स्थापना व संस्था निर्मितीचे काम प्रगतीपथावर आहे. कृषी उत्पादकता वाढ व बाजार जोडणीच्या दृष्टीने पीक प्रात्यक्षिके,काढणी पश्चात तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रात्यक्षिके, कृषी विषयक नाविण्यपूर्ण प्रकल्प व प्रमुख कृषी उत्पादनास व्यापक बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी (पी.पी.पी) तत्वावर प्रयत्न हे उपक्रम राज्यात व्यापक स्वरुपात व निरंतरपणे राबविले जात आहेत.

४) राज्यतील सर्व जिल्ह्यातून शेतमाल उत्पादन व विक्रीसाठीची कार्यप्रणाली अधिक चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी बाजारपेठ कार्यपध्दती पुरवणी (एम.एस.एस.) तयार करण्यात आल्या. त्याचबरोबरप्रत्येक जिल्ह्यात ग्राहक विक्रेता संमेलने, स्थापीत उत्पादक संघांचे बळकटीकरण, नाविण्यपूर्ण प्रकल्प इ. राबविण्यात आले.

५) प्रकल्पांतर्गत कृषी व्यवसाय निर्मिती सुविधा ही व्यवस्था निर्मितीसाठी नेमलेल्या सेवा पुरवठादारांच्या सेवांमध्ये वृध्दी होवून संलग्न शासन विभागातील अधिका-यांसाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन, कृषी व्यावसायिकांसाठी बँकांना सादर करावयाचे प्रकल्प तयार करणे, प्रकल्पाशी संबंधीत वाचन साहित्याची निर्मिती , प्रकल्पाशी संबंधीत विशेष अभ्यास हाती घेणे इ. कामांची पूर्तता करण्यात आली.

६) पशुधन सहाय्य सेवा या घटकांतर्गत जनावरांचे व शेळ्यामेंढ्यांच्या बाजारमाध्ये सुविधा निर्माण करण्याबरोबरच विविध क्षेत्रीय उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. राज्यातील निवडक १८ जिल्ह्यांमध्ये जनावरांची शिबीरे, चारपीक प्रात्यक्षिके व राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र,पुणे येथे पशुसंवर्धन विभागातील अधिका-यांच्या पाच दिवसीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. नाविन्यपूर्ण उपघटक म्हणून अहमदनगर, जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील शेळीमेंढी पालकांचे १५० गटांची स्थापना करणे व या गटांच्या एकत्रीकरणातून फेडरेशनची स्थापना करुन कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणी करणे ही कामे सेवा पुरवठादार संस्थेच्या सहाय्यातून पूर्ण करण्यात आली. याचबरोबर स्थापन केलेल्या गटातील सदस्यांचे प्रशिक्षण, प्रत्येक गटातील निवडक सदस्यांना पैदासक्षम उस्मानाबादी बोकडांचे वाटप या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व आत्माच्या माध्यमातून या सर्व उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये हाती घेतलेल्या "शेळीपालन एक उच्च मुल्यवर्धी व्यवसाय" या नाविण्यपूर्ण घटकांतर्गत काही निकषांवर आधारीत २५० शेळी - मेंढी पालकांची निवड करुन त्यांची पथदर्शी प्रत्यक्षिके उभारण्यासाठी सेवा पुरवठादार संस्थेची नेमणूक करण्यात आली होती. या संस्थेने २५० प्रात्यक्षिकांची उभारणी केली असून चारा पीकांची प्रात्यक्षिके घेणे, निवडलेल्या शेतक-यांचे सर्वंकष

प्रशिक्षण आयोजित करणे. त्यांना पैदासक्षम उस्मानाबादी बोकडांचा पुरवठा करणे इ. उपक्रम राबविले आहेत.

७) पर्यायी बाजारपेढ निर्मितीची गरज ओळखून प्रकल्पांतर्गत वरवार महामंडळाच्या माध्यमातून गोदामांमध्ये सुविधा निर्माण करण्यासह वखार तारण योजना, आठवडी बाजारांमध्ये सुधारणा व शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यमातून शेतकरी सामुहिक केद्रांची उभारणी हे उपक्रम मोठ्या प्रमाणात हाती घेतले आहेत. आजअखेर ९८ आठवडी बाजारांची कामे पूर्ण झाली असून १४१ कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच २२ आठवडी बाजारांची टेंडर प्रक्रिया सुरु असून ८९ आठवडी बाजारांचे प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे.

८) महाराष्ट्र राज्य वरवार महामंडळाच्या राज्यातील निवडक ११२ गोदामांचे काम प्रगतीपथावर आहे. यापैकी ४० गोदांमामध्ये प्रयोगशाळा स्थापित केल्या आहेत. तसेच राज्यातील १३१ गोदामांची WDRA शी जोडणी झाली असून यापैकी २६ गोदामांना मान्यता मिळाली आहे. याचबरोबर ४० गोदामांची ऑनलाईन विक्रीसाठी NCDEX शी जोडणी झाली असून वखार पावती योजनेअंतर्गत सात राष्ट्रीयकृत बँकांशी संलग्नता आहे. एकंदर ८२ गोदांमध्ये इ-वखार पावती योजना कार्यरत असून सन २०१३-१४ मध्ये ६७ गोदांमांमध्ये ११२३८ पावत्या प्रदान केल्या आहेत. या प्रक्रियेतून संबंधीत बँकांकडून ५५.४४ कोटीचे कर्ज शेतक-यांना प्राप्त झाले असून ही एक मोठी साध्यता आहे. पुढील काळात याची व्याप्ती निश्चित वाढेल अशी अपेक्षा आहे.

९) बाजारांचे आधुनिकीकरण व अमंलबजावणी आराखडा राबविण्यासाठी बाजार समित्यांच्या संचालकांची मानसिकता व बदलत्या परिस्थितीमध्ये व्यवस्थापनामध्ये बदलाची भुमिका या बाबी महत्वाच्या आहेत. त्यादृष्टीने NIPHT, तळेगाव येथे बाजार समित्यांचे संचालक व आठवडी बाजाराच्या ग्रामपंचायतींचे पदाधिकारी यांच्यासाठी कार्यशाळा, तसेच बाजार समित्यांच्या संचालकांसाठी राज्याबाहेरील अभ्यास दौऱ्यांचे आयोजन व अनुभवांची देवाण घेवाण व्हावी यासाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

१०) प्रकल्पाच्या ३ टप्प्यातील जिल्ह्यातून एकंदर ३ बाजार समित्या व ५ जनावरांचे बाजारातील कामे पूर्ण झाली आहेत, १ बाजार समिती व २ जनावंराचे बाजारांमध्ये काम सुरु होत आहे, तसेच १५ बाजार समित्या व ७ जनावरांचे बाजारांचे टेंडर प्रक्रिया सुरु असुन ४५ बाजार समित्या व ७ जनावरांचे बाजारांचे प्रस्ताव तयार करण्याचे काम सेवा पुरवठामार्फत सुरु आहे.

११) प्रकल्पाचे नियमितपणे संनियंत्रण व मुल्यमापन केले जात असुन त्यामध्ये पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन आराखडा, प्रकल्प निधीचे व्यवस्थापन तसेच प्रकल्पांतर्गत कामाबाबत निर्माण होणाऱ्या विवादांचे निराकरण याबाबतच्या उपाययोजनांची अंमलबजावणी केली जाते. तसेच संलग्न शासन विभागामार्फत क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सुचनांसह पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन व विवाद निराकरणाबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सुचना दिल्या जातात.

१२) जागतिक बँकेचे अधिकारी व मा. अतिरिक्त मुख्य सचिव (कृषि व पणन) यांचे मियमीत मार्गदर्शन व सहाय्य प्रकल्पास मिळत असल्याबाबत प्रकल्पाचे वतीने आभार.